# सायबर सेल,वाशिम

पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम

मेलआडी:cybercell.wsm@mahapolice.gov.in / फोन नं. : +917252297200

Website:www.washimpolice.gov.in

## प्रेस नोट

## मद्यपींनो सावधान घरपोच दारू चे अमीष दाखवुन केली जाती आहे ऑनलाईन फसवणुक

लॉकडाउन काळात सर्व मद्यविकी चे दुकान बंद असल्याचा फायदा घेवुन काही अपराध्यांनी ही संधी साधत मद्यविकी ची नवीन शक्कल लढविली आहे.यामध्ये ही लोक सोशल मीडीया जसे की, फेसबुक,इंन्सटाग्राम,व्हॉटसॲपचा वापर करून त्यावर घरपोच दारू मिळेल अशी जाहीरात करून त्यांचे मोबाईल कमांकावर संपर्क साधन्याचे आवाहन करतात व त्यानंतर त्यांना फोनवरून संपर्क केला असता. दारूची चढ्यादराने कींमत सांगुन आपला पत्ता विचारून आपली आर्डर स्विकारून आपल्यास गुगल पे, फोन पे,चा नंबर सांगुन त्यावर पैसे टाकण्यास सांगीतले जाते.एकदा आपण पैसे पे केल्या नंतर काही तरी बनवा बनवीचे कारण सांगुन कींवा पोलीसांनी आमच्या डिलीव्हरी बॉय ला पकडले आहे असे सांगुन परत पैशाची मागणी करतात व पैसे मिळताच पैसे घेवुन पसार होतात.राज्यात अशा मोठया प्रमाणात घटना घडत असल्याने ऑनलाईन आर्थीक फसवणुकीचे गुन्हे टाळण्याकरीता वाशिम जिल्हा पोलीस दलाचे प्रमुख श्री वसंत परदेशी यांचे कडुन खालील प्रमाणे दक्षता घेण्याची आवाहन नागरीकांना करण्यात आले आहे.

- ऑनलाईन मद्यविकीच्या जाहीरातींना बळी पडुन आर्थीक व्यवहार करू नये.
- google pay , phone pay यांसारख्या वॅलेट चे UPI PIN / OTP कोणालाही सांगु नये.
- google pay , phone pay यांसारख्या वॅलेट चे Customor care नंबर google वर सर्च करू नयेत ते शक्यतो फसवे असतात.
- अनओळखी व्यक्तींकडुन QR Code चा वापर करून पैशाची देवाण–घेवाण करणे टाळावे.
- KBC ,लॉटरी,यांसारख्या प्रलोभनांना बळी पडुन आपली वैयक्तीक माहीती अनओळखी व्यक्ती किंवा कंपनीला शेअर करू नये.
- OLX किंवा तत्सम साईट वर एखादी वस्तु खरेदी करतांना व्यक्तीशः भेट घेवुन रोखीने व्यवहार करावा.
- google pay , phone pay यांसारख्या वॅलेट वर व्यवहार करतांना आपण नेमका काय व्यवहार करतोय हे तपासून बघा ब–याचवेळा आपण payment स्वीकारण्या एवजी pay option वर क्लीक करतो व पैसे घेण्याएवजी पैसे देवुन बसतो.

सायबर गुन्हयांबाबत वाशिम जिल्हा पोलीस दल सायबर सेल च्या माध्यमातुन गंभीर दखल घेत असून नागरीकांनी वरील सुचनांचे पालन करावे असे आवाहन यादवारे मा. जिल्हा पोलीस अधीक्षक श्री वसंत परदेशी यांनी केले आहे.

22/04/20

पोलीस निरीक्षक

सायबर सेल,वाशिम